# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय बॉक्सिंग (पुरुष/महिला)

# स्पर्धा- सन २०२३-२४

**-:संयोजक:-**

**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**

**ता – वाळवा, जि – सांगली**

**शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय बॉक्सिंग(पुरुष/महिला) स्पर्धा- सन २०२३-२४**

- **संयोजक – कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण-इस्लामपूर**
- **प्राचार्य – डॉ. ए. बी. पाटील मो. नंबर – ९४२३२७१६३६**
- **शारीरिक शिक्षण संचालक – प्रा. अमितराज उत्तमराव माने**
- **मो. नंबर – ७२१९५११७७७**
- **स्पर्धा ठिकाण – सर्जेराव यादव बॉक्सिंग अकॅडेमी इस्लामपूर**
- **स्पर्धा कालावधी- ०२ दिवस (८,९ डिसेंबर २०२३ )**
- **स्पर्धा क्रीडा प्रकार – बॉक्सिंग (पुरुष व महिला)**
- **संयोजन समिती -**

| अ. क्र | नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा. प्राचार्य डॉ. ए.बी.पाटील | चेअरमन |
| २ | उपप्राचार्य प्रा. डॉ. एन. एस. शिंदे | सदस्य |
| ३ | उपप्राचार्य प्रा.एस.बी. पाटील | सदस्य |
| ४ | पर्यवेक्षक प्रा. एम. टी. खंडेलोटे | सदस्य |
| ५ | डॉ. पी. ए. गंगणमाले | सदस्य |
| ६ | प्रा.डॉ.बी.ए. सावंत (सीनियर कार्याध्यक्ष) | सदस्य |
| ७ | प्रा. पी. एच. पाटील (जूनियर कार्याध्यक्ष) | सदस्य |
| ८ | डॉ. सी. पी. परदेशी | सदस्य |
| ९ | डॉ. अमितराज उत्तमराव माने | सचिव |
| १० | डॉ. एस. एस. पाटील | उपसचिव |
| ११ | प्रा. के.आर.ठाकरे | उपसचिव |
| १२ | श्री. अजित पाटील | प्रशासकीय कर्मचारी |

**-: स्पर्धा अहवाल :-**

दि. ८ व ९ डिसेंबर २०२३ रोजी इस्लामपूरच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय बॉक्सिंग(पुरुष/महिला) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटन सर्जेराव यादव बॉक्सिंग अकॅडेमीचे अध्यक्ष मा. सर्जेराव यादव यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूरचे उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते. तर प्रमुख उपस्थितांमध्ये  शिवाजी विद्यापीठ बॉक्सिंग समितीचे चेअरमन डॉ. निलेश पाटील, सदस्य प्रा. अभिजित आंबी, प्रा. अमित गिरीगोसावी, स्पर्धेचे निरीक्षक प्रा. एच. ए. पाचोरे, सांगली जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे सचिव मा. शेरखान कुरणे, वाळवा तालुका बॉक्सिंग संघटनेचे अध्यक्ष श्री. विनायक कांबळे, कोल्हापूर विभागीय क्रीडा परिषदेचे सचिव प्रा.सुहास वाघ तसेच विविध महाविद्यालयातून आलेले शारीरिक शिक्षण संचालक होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सर्जेराव यादव बॉक्सिंग अकॅडेमीचे अध्यक्ष मा. सर्जेराव यादव यांनी मार्गदर्शन करताना बॉक्सिंग मध्ये असणाऱ्या संधी तसेच बॉक्सिंग अकॅडेमी सुरु करण्यामागील उद्दिष्टे सांगितली, ग्रामीण भागात सुरु होणारी ही पश्चिम महाराष्ट्रातील पहिली बॉक्सिंग अकॅडेमी आहे अद्यावत अशी बॉक्सिंग रिंग असून यातून ग्रामीण विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध होतील त्याचा त्यांनी वापर करावा व प्राविण्य मिळवावे असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूरचे उपप्राचार्य डॉ. नितीन शिंदे यांनी सर्व खेळाडूंना शुभेच्या दिल्या तसेच बॉक्सिंग खेळात भारताचे नाव जगात उंचावणाऱ्या मेरी कोम, विजेंदर सिंग यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन सर्वांनी सराव करावा असे सांगितले, तसेच बॉक्सिंग या खेळास कॉलेज सर्वोतोपरी सहकार्य करील व त्यास संस्थाही मदत करेल असे सांगितले. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक जिमखाना विभागाचे प्रमुख प्रा. अमितराज माने तर आभार डॉ. संदीप पाटील यांनी केले. सदर स्पर्धा पुरुष १३ वजनी गटात तर महिला १२ वजनी गटात घेण्यात आल्या.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ कॉलेजचे वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी.व्ही. गायकवाड यांच्या हस्ते झाले त्यांनी सर्व विजयी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या तर ज्यांना विजय मिळवता आला नाही अशा सर्व खेळाडूंनी अधिक परिश्रम करून पुन्हा नव्या जोमाने स्पर्धेत भाग घ्यावा असे सांगितले. यावेळी सर्जेराव यादव बॉक्सिंग अकॅडेमीचे अध्यक्ष मा. सर्जेराव यादव, सांगली जिल्हा बॉक्सिंग संघटनेचे सचिव मा. शेरखान कुरणे, शिवाजी विद्यापीठ बॉक्सिंग समितीचे चेअरमन डॉ. निलेश पाटील, सदस्य प्रा. अभिजित आंबी, प्रा. अमित गिरीगोसावी, स्पर्धेचे निरीक्षक प्रा. एच. ए. पाचोरे उपस्थित होते. स्पर्धेतील विजेत्यांना मेडल देण्यात आले तर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व पंचांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या स्पर्धेतून  शिवाजी विद्यापीठाचा बॉक्सिंग (पुरुष,महिला) संघ निवडण्यात आला तो पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत खेळेल. स्पर्धेच्या बक्षीस समारंभाचे प्रास्ताविक जिमखाना विभागाचे आभार डॉ. संदीप पाटील यांनी केले. तर आभार डॉ.अमितराज माने यांनी मानले. सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी सहकार्य केले. तर जिमखाना विभागाचे प्रा. अमितराज माने, डॉ. संदीप पाटील, प्रा. के. आर. ठाकरे व अजित पाटील यांनी परिश्रम घेतले.